अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
DAY NULM विभाग
दिनांक दि- 02/06/2022

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**
**प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतर्गत " स्वनिधी से समृध्दी" कार्यक्रमातंर्गत मोबाईल ॲप माहिती संकलन करण्याकरिता बाह्यस्थ संस्था निवडीसाठी कोटेशन**

अहमदनगर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या दि.17/05/२०२२ रोजीच्या मंजुरीने PM SAVNidhi च्या एकुण २५५७ लाभार्थ्याचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण मोबाईल ॲप द्वारे माहिती संकलन करुन करण्याकरिता कोटेशन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | तपशिल | कामाचा कालवधी | प्रति लाभार्थी दर | एकुण रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | PM SAVNidhi चे वेबसाईट वरील उपलब्ध प्रश्नावलीच्या २५५७ लाभार्थ्याचे मोबाईल ॲप द्वारे सामजिक -आर्थिक सर्वेक्षण करुन त्याच्या कुटुबाची माहिती संकलीत करणे **"स्वानिधी से समृध्दी" अतर्गत " सामाजिक आर्थिक सर्वेक्षणामध्ये लाभार्थ्याची राहण्याची जागा/ घर व इतर मालमत्ता, आरोग्य व दिव्यांग/ अपंगत्व दर्जा, शिक्षण, कौशल्य व रोजगार, महला व बालकल्याण, बॅकिंग व विमा, स्थलांतरण, कुटुंबियांचा व्यावसायिक दर्जा, महत्वाकांक्षाव अन्य संबधित प्रश्न बाबत " माहिती संकलित करणे .** | ४५ दिवस | | | |

**अटी व शर्ती-**

१) सदरील कोटेशन बाबतच्या अटी व शर्ती अहमदनगर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमधील नोटीस बोर्डावर लावण्यात येईल व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान विभागात पाहण्यास उपलब्ध आहे.

२) कोणतेही कोटेशन स्विकारणे , नाकरणे अथवा रद्द करणे याबाबत अंतिम अधिकार मा. शहर प्रकल्प अधिकारी तथा उपायुक्त (कर) अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील.

३) कोटेशन सोबत सर्व कागदपत्रे साक्षाकित करुनच दाखल करावीत.

४) कोटेशन सोबत पुढील कागदपत्रे असतील.

अ) संस्था, मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल

ब) संस्थेस स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे. संस्था ही स्थानिक प्राधिकरणाने

काळ्या यादीत टाकलेले नसल्याचें रु.१००/- किमंतीच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सोबत जोडावे.

क) संस्था त्या-त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत . कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी नसल्याचे रु. १००/- किमंतीच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सोबत जोडावे.

ड) संस्था यांना सॉफ्टवेअर (software) च्या माध्यमातुन सर्वे करण्याच्या कामाचा किंवा तत्सम सर्वे करण्याचा कामाचा ,सामाजिक क्षेत्रामध्ये सर्वेक्षण व क्षेत्रात किमान तीन वर्ष काम केल्याचा अनुभव असावा. अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडावे.

५) सर्वेक्षणाकरिता संस्थेकडे मोबाईल ॲप व software असणे गरजेचे आहे.

६) अशा प्रकारचे काम महानगरपालिका/ शासन/ निमशासन स्तरार केल्याचे अनुभव असल्यास प्राधन्य देण्यात येईल.

७) कोटेशन मंजुर झाल्यानंतर मंजुर निविदा दराने महानगरपालिकेचे मा. आयुक्त तसेच इतर संबधित अधिकारी यांच्या सुचनेनुसार सर्वेक्षण करणे बंधनकारक राहिल.

८) मंजुर कोटेशन संस्थेस अहमदनगर महानगरपालिकाने प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिका-यास तापसणीकरिता आवश्यक ते सर्वोतपरी सहाय्य करणे बंधनकारक राहील.

९) मंजुर कोटेशन संस्थेशी त्वरीत संपर्क साधता येईल अशा व्यवस्था मोबाईल दुरध्वनी संपर्क व्यक्ती असली पाहिजे.

१०) मंजुर कोटेशन संस्थेकडे असणा-या सर्व मनुष्यबळाकडे आधार कार्ड असणे अनिवार्य आहे.

११) मंजुर कोटेशन संस्थेकड असणा-या सर्व मनुष्यबळ यांचे मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक असणे अनिवार्य आहे.

१२) मंजुर कोटेशन संस्थेकडे असणा-या सर्व मनुष्यबळ यांचे स्वतःचे ई मेल आयडी असणे अनिवार्य आहे.

१३) मंजुर कोटेशन संस्थेकडे असणा-या सर्व मनुष्यबळा याच्याकडे Android OS Supporting Mobile असणे अनिवार्य आहेत

१४)software मध्ये ward ची माहिती upload करणे तसेच इतर माहिती पण upload करणे आवश्यक आहे.

१५) सर्वेक्षण झाल्यानंतर त्याची पुर्ण माहिती software वर upload करणे.

१६) कोटेशन मंजुर झाल्याचे कळविल्यापासुन ५ दिवसांत सदर कामासंबधी संस्थेस स्वखर्चाने करारनामा करावा लागेल.

१७)सदरचे काम हे कार्यादेश मिळाल्यांपासुन ४५ दिवसात पुर्ण करुन विहित नमुन्यात महानगरपालिकेकडे सुपुर्द करावे लागेल.

१८) संस्थेस काम विहित कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक राहिल. विहित मुदतीत काम पुर्ण न केल्यास प्रति दिन रु. ५००/- दंडाची आकारणी करण्यात येईल.

१९) मुळ कागदपत्राची मागणी केल्यास ती संस्थेने तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.

२०) सस्थेने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेत त्याचे काम दुय्यम संस्थेकडुन जादा दराने करुन घ्यावे लागल्यास होणारा जादा खर्च त्यांना देय असलेल्या रक्कमेमधुन समायोजित करणेत येईल.

२१) विहीत मोबाईल app व software मध्ये माहिती संकलित करणे बंधनकारक असेल.

२२) कोणतेही अट स्वीकारणे अथवा नाकरणे हा आयुक्त चा अधिकारअसेल. अथवा कोणतेही कारण न देता नाकरणे हे मा. आयुक्त यांचा असेल.

२३) सदर संकलित केलेली माहिती कोणत्याही इतर कामासाठी इतर कोणासही देता येणार नाही. सदर माहिती इतराल उपलब्ध करुन दिल्यास निर्दशनास आल्यास संस्थेवर फौजदारी स्वरुपाचा कार्यवाही करण्ात येईल.

२४) सर्व माहिती बिनचुक भरणे आवश्यक आहे.माहितीमध्ये चुक अथवा त्रुटी आढळल्यास दंडात्माक कार्यवाही केली जाईल.

२५) महानगरपालिका लेखापरिक्षणात / सामान्य तपासणीत काही आक्षेपाधीन रक्कम निघाल्यास सदर रक्कम मंजुर संस्थेकडुन वसुल करण्यात येईल. सदर रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

२६) संस्थेस कामगार कायद्यातील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

२७) काम पुर्ण झाले नंतर बील सादर केल्यानंतर केलेल्या कामाचा देयके उपलब्ध करुन दिल्या जातील.

२८) कोणतेही कोटेशन स्वीकरणे ,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतच अंतिम अधिकार मा. शहर प्रकल्प अधिकारी तथा उपायुक्त (कर) , अहमदनगर महानगरपालिका यांना राहिल.

उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका

प्रति,
.....................................
.....................................
.....................................
अहमदनगर.

**विषय-प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतर्गत " स्वनिधी से समृध्दी" कार्यक्रमातंर्गत मोबाईल ॲप माहिती संकलन करण्याकरिता दरपत्रक सादर करणे बाबत.**

अहमदनगर महानगरपालिकेतील PM SAVNidhi च्या २५५७ लाभार्थ्याचे मोबाईल ॲप द्वारे सामजिक - आर्थिक सर्वेक्षण करुन त्याच्या कुटुबाची पात्रता तपासणे "स्वानिधी से समृध्दी" अतर्गत " सामाजिक आर्थिक सर्वेक्षणामध्ये लाभार्थ्याची राहण्याची जागा/ घर व इतर मालमत्ता, आरोग्य व दिव्यांग/ अपंगत्व दर्जा, शिक्षण, कौशल्य व रोजगार, महला व बालकल्याण, बॅकिंग व विमा, स्थंलातरण, कुटुंबियांचा व्यावसायिक दर्जा, महत्वाकांक्षाव अन्य संबधित प्रश्न बाबत " माहिती गोळा करणेकरिता शासकीय दराप्रमाणे कोटेशन खालील तक्तात आवश्यक आहेत.

| अ क्र | तपशिल | कामाचा कालवधी | प्रति लाभार्थी दर | एकुण रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | PM SAVNidhi चे वेबसाईट वरील उपलब्ध प्रश्नावलीच्या २५५७ लाभार्थ्याचे मोबाईल ॲप द्वारे सामजिक -आर्थिक सर्वेक्षण करुन त्यांच्या कुर्टुबाची माहिती संकलीत करणे **"स्वानिधी से समृध्दी" अतर्गत " सामाजिक आर्थिक सर्वेक्षणामध्ये लाभार्थ्याची राहण्याची जागा/ घर व इतर मालमत्ता, आरोग्य व दिव्यांग/ अपंगत्व दर्जा, शिक्षण, कौशल्य व रोजगार, महला व बालकल्याण, बॅकिंग व विमा, स्थंलातरण, कुटुंबियांचा व्यावसायिक दर्जा, महत्वाकांक्षाव अन्य संबधित प्रश्न बाबत " माहिती संकलित करणे .** | ४५ दिवस | | | |

तरी आपण सदर कामाकरिता इच्छुकअसल्यास दि. 09/06/2022 रोजी सायं ६.०० वा. पर्यत दर पत्रक दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कक्ष , संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल, माळीवाडा , प्रभाग समिती क्रं. २ येथे सादर करावे.

उपायुक्त
अहमदनगर महानगरपालिका